आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजनेसाठी निधी वितरीत करणेबाबत...
(लेखाशिर्ष २२२५एफ१०२)

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०२६ / प्र.क्र.०२ / कार्यासन-६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १९ मे, २०२६.

**वाचा :-** १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६.
२. आदिवासी विकास विभाग, क्र.मसैशा-२०२६/प्र.क्र.५१/प्र.क्र.१२ (ई-ऑफीस क्र.१६१८४८९)

**प्रस्तावना :-**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता या योजनेतून सैनिक शाळा, सातारा येथे शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील १ विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीसाठी एकूण रु.१,७१,८७९ /- इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास प्रस्ताव प्राप्त झाला होता.

त्यास अनुसरुन वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या निधी मर्यादेत सैनिक शाळा, सातारा येथे शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील १ विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्तीसाठी सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता या योजनेतून रु.१,७१,८७९ /- इतका निधी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत अनुसूचित जमाती घटकासाठी मागणी क्र.टी-५ मधील मुख्य लेखाशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण याखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पित तरतुदींतून सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता योजनेसाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर पुढीलप्रमाणे निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

(रु.लाखात)

| योजनेचे नाव | लेखाशिर्ष | बाब | सन २०२६-२७ मधील अर्थसंकल्पीत तरतूद | सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता | २२२५एफ १०२ | ३४-शिष्यवृत्या / विद्यावेतने | ३०.०० | १.७१८७९ |

२. **उपरोक्त प्रमाणे रु. १.७१८७९ लाख (अक्षरी रुपये एक लाख एकाहत्तर हजार आठशे एकोणऐंशी फक्त) इतका निधी प्रशासकीय विभागप्रमुख म्हणून प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई** यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करताना नियंत्रक अधिकारी यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका यामधील वित्तिय नियम तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन परिपत्रकातील दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर निधीची ज्या प्रयोजनासाठी मागणी केली आहे. त्याच प्रयोजनार्थ खर्च करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची आहे.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदींतुन फक्त अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ मिळेल याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागामार्फत अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या निधी मर्यादेत व प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५१९१०४२५०६३२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRAVIN DNYANOBA KOTME
Date: 2026.05.19 10:45:21 +05'30'

**( प्रविण ज्ञा. कोतमे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
७. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग
८. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
९. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३. कक्ष अधिकारी (कार्या-१२), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवड नस्ती (का-६), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.